http://www.howtoexam.com

**Code No. 07**

Total No. of Questions : 74 ] [ Total No. of Printed Pages : 4

**June/July, 2009**

# MARATHI

Time : 3 Hours 15 Minutes ] [ Max. Marks : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

HowToExam.com

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) पावसाळ्यातील एक दिवस

2) दहशतवादाचा भस्मासूर

3) अंधश्रद्धा

4) पुस्तकाचे आत्मवृत्त

5) विद्यार्थ्यांचे मनोगत.

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) एका स्त्रीने गोविंदप्रभूंच्या ओटीत काय टाकले ?

7) शत्रूपक्षाला कशाची दहशत वाटे ?

8) फाल्गुनराव व कृतिका याना कशाने पछाडले होते ?

9) विठ्ठल रामजी शिंदेना महर्षी का म्हणत ?

10) निर्मलकुमार फडकुलेनी तुलना केलेले दोन संतकवी कोण ?

11) भीमाने वैद्याना कोणती आज्ञा दिली ?

12) मूर्तिजापूर येथे तिडके यानी कोणाच्या स्मरणार्थ व्याख्यानमाला चालविली होती ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) फाल्गुनरावांच्या स्वभावाचे वर्णन करा.

14) दुर्गा भागवतांशी झालेल्या संवादातून प्रकट होत गेलेल्या संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

15) निवेदकाला आईची आठवण का व केंव्हा झाली ?

[ Turn over

Previous year old exam question papers and there answers available for free

http://www.howtoexam.com



क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) आंबेडकर मास्तर.

17) साने गुरुजी आणि मानवता.

18) अंकुश पाठातून दिसणाऱ्या भीमाचे व्यक्तिचित्र.

19) माध्यमांतर.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चे ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) ''देवाच्या क्षमेचा कधी अनुभव आला आहे काय, क्षमेस पात्र आहात असे तुम्हाला वाटते का ?''

21) ''ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे''.

22) ''पुस्तकांची मोट बांधून आणि त्यातली अक्षर घोकून तू काय करणार, त्यात हृदय नसेल तर शब्दज्ञान व्यर्थ नाही का ?''

23) ''बाळ, तुला, लागले तर नाही ना ?''

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

24) नामदेव नारायणाकडे कोणते मागणे मागतात ?

25) रूक्मिणीला कोणता शुभशकुन झाला ?

26) कवीला कुणाच्या बाह्या वर चढणार आहेत, असे वाटते ?

27) 'एका नव्या संघर्षात' या कवितेचे कवी कोण आहेत ?

28) रेल्वे प्लॅटफॉर्मवरील कोवळ्या पोरांचे काय हरवले आहे ?

29) पाठीवर पान पडताच कांगावा करणारे ससे कशाच्या भितीखाली असतात ?

30) 'ह्या नभाने दान द्यावे' या कवितेच्या निवेदकाचे प्राण कशात गुंतले आहेत ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) समर्थानी सांगीतलेली चातुर्य लक्षणे कोणती ?

32) 'ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे' या कवितेचा सारांश लिहा.

33) 'तणकट' कवितेचे रसग्रहण करा.

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

34) 'ठरविते किती मी' भावार्थ.

35) 'कानातील झुंबरे' मधील पुरूष प्रधान व्यवस्था.

36) पाठ्यपुस्तकातील नामदेवांचा अभंग.

37) लाट तेजाची मधील नव्या जीवनाचा नाद.

Previous year old exam question papers and there answers available for free

http://www.howtoexam.com



ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंचे** संदर्भासह स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

38) ज्ञानी तो कोण विज्ञानी तो कोण ।

दोहींच्या आपण साक्षीभूत ॥ २ ॥

39) माळा ऊचलितां प्रिय आपणही रथावरूनिया लवला ।

लव लागेना तों घे अंकी करूणासमुद्र कालवला ॥

40) कुणीं दाबुनी जखम आजची

जरा उद्याचा काढावा पूं ।

41) ''राखाडी रंगाच्या सश्याना रान वर्ज्य आहे. तसं म्हातारं गवतही. झोपू शकत नाहीत ते नुसत्याच भुईवर.''

IV. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : 2 × 5 = 10

42) अंगणातला पोपट कथेतील पात्रांचा परिचय लिहा.

43) भाबड्या बकसच्या मनातील दुःख नेमकेपणानें मांडा.

44) 'कलिंगड' हा मायलेकीच्या नात्यातील दुवा कसा ठरला ?

45) 'तिची गोष्ट' ची नायिका व तिचे कुटुंबिय यांचे परस्परातील नाते कशा प्रकारचे आहे ते लिहा.

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर बातमी तयार करा : 1 × 5 = 5

46) तुमच्या गावी पंतप्रधानांचा दौरा.

47) तुमच्या गावातील साहित्य संमेलन.

48) तुमच्या महाविद्यालयास क्रिकेटचे अजिंकयपद मिळाले.

ब) कंसातील सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा. 5 × 1 = 5

49) मी प्रश्नपत्रिका सोडवत आहे. ( काळ ओळखा )

50) रोजची कामे ( वेळ ) वर करावित. ( सामान्य रूप करा )

51) तोंडातोंडी चालत आलेली कथा. ( समूहदर्शक शब्द लिहा )

52) त्याने फळ खाल्ले ( प्रयोग ओळखा )

53) शाळा-विद्यार्थी ( समानार्थी शब्द लिहा ).

क) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 5 × 1 = 5

54) डोळे उघडणे.

55) उखळ पांढरे होणे.

56) नाक खुपसणे.

57) जीवाचा जळफळाट होणे.

58) अकलेचा कांदा असणे.



Previous year old exam question papers and there answers available for free

http://www.howtoexam.com



ड) खालील इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

59) पर्सनल

60) रजिस्ट्रेशन

61) अर्जंट

62) बाय हँड

63) इनवर्ड नंबर.

इ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या विभक्ती लिहा : 5 × 1 = 5

64) आज तिनें माझ्याशी खूप गप्पा मारल्या.

65) माझ्या खिडकीत रोज एक पांखरु येते.

66) तो उतारा वाचून माझे खूप समाधान झाले.

67) काल आजीची गोष्ट ऐकताऐकताच माझा डोळा लागला.

68) नोकरी लागल्यापासून तो खूप आनंदात आहे.

VI. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

गीतेवरील मराठी उत्तम ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय. आपण आपली टीका 'भाष्यकारांते ( शंकराचार्यास ) वाट पुसत' रचिली असे ज्ञानेश्वरानी स्वत: आपल्या ग्रंथाच्या शेवटी म्हटलें आहे. तथापि गीतेचा अर्थ अनेक सरस दृष्टांतानी फूलवून सांगण्याची ज्ञानेश्वर महाराजांची शैली अलौकीक असून शंकराचार्यापेक्षा भक्तीमार्गाचे व निष्काम कर्माचे त्यानी समर्थन केले आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा गीतेवरचा एक स्वतंत्रच ग्रंथ मानला पाहिजे. ज्ञानेश्वर महाराज हे स्वत: योगी होते म्हणून गीतेच्या सहाव्या अध्यायात पातंजल योग अभ्यासाचा विषय ज्या श्लोकात आला आहे. त्यावर त्यांची विस्तृत टीका असून. त्यांचे असे म्हणणे आहे की, अध्यायाच्या शेवटी 'तस्मोद्योगी भवार्जुन' — या साठी हे अर्जुना ! तू योगी म्हणजे योग्याभ्यासात प्रवीण हो. असे अर्जुनास सांगून सर्व मोक्ष पंथात पातंजल योगासच भगवंतानी ''पंथराजु'' म्हणजे सर्वोत्तम पंथ ठरविले आहे. ज्ञानेश्वरी ही भक्तीमार्गी व कर्मयोगी आहे असे म्हणतात याला झेत देऊन ज्ञानेश्वरी ही पातंजल योगाचा पंथराज म्हणून पुरस्कार करते असेही सांगता येईल.

69) गीतेवरील उत्तम मराठी ग्रंथ कोणता ?

70) ज्ञानेश्वर महाराजानी कशाचे समर्थन केले आहे ?

71) गीतेच्या सहाव्या अध्यायात अभ्यासाचा विषय कोणता आहे ?

72) अध्यायाच्या शेवटी अर्जुनास काय सांगीतले आहे ?

73) 'पंथराजु' कशास म्हटले आहे ?

**किंवा**

74) गावातील पाणी पुरवठा योग्य रितीने व्हावा म्हणून नगरपालकाना निवेदन पत्र लिहा.

Previous year old exam question papers and there answers available for free